## प्रकरण दुसरे

## खटाव तालुक्याची आर्थिक रुपरेषा


२.१ प्रस्तावना

२.२ खटाव तालुक्याचे भौगोलिक स्थान

२.२.१ तालुक्याच्या सीमा

२.२.२ क्षेत्रफळ

२.३ हवामान

२.३.१ तपमान

२.३.२ पर्जन्य

२.४ लोकसंख्येची रचना

२.५ मृदा

२.६ नदी

२.७ शेती व्यवसाय

२.७.१ पीकांचा आकृतीबंध

२.७.२ शेतक-यांची क्षेत्रानुसार विभागणी

२.७.३ ओलित व्यवस्था

२.७.४ ओलिताची साधने

२.८ जंगल

२.९ वाहतूक व्यवस्था

२.१० आठवडी बाजार

२.११ बँक सेवा सुविधा

२.१२ सहकारी संस्था

२.१३ पशुधन

२.१४ तालुका प्रशासन

## प्रकरण दुसरे

## खटाव तालुक्याची आर्थिक रूपरेषा


### २.१ प्रस्तावना :


महाराष्ट्रातील सातारा जिल्हाचे भौगोलिक स्थान १७°.५ ते १८°.११ उत्तर अक्षांश आणि ७३°.३३ ते ७४°.५४ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. सातारा जिल्हाच्या पूर्वेस सोलापूर पश्चिमेस रत्नागिरी, दक्षिणेस सांगली, रायगड, रत्नागिरी आणि उत्तरेस पुणे जिल्हे येतात. महाराष्ट्र राज्याच्या प्रशासनासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, कोकण आणि अमरावती असे सात विभाग करण्यात आले आहेत. सातारा जिल्हाचा समावेश पुणे विभागात होतो.

भौगोलिकदृष्ट्या सातारा जिल्हाची विभागणी करून पूर्व, पश्चिम आणि मध्य विभाग (झोन) तयार करण्यात आले आहेत. सातारा जिल्हाचे एकूण क्षेत्रफळ १०४९२ किलोमीटर आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हाची लोकसंख्या २०४१४०९ इतकी आहे.

### २.२ खटाव तालुक्याचे भौगोलिक स्थान :

सातारा जिल्हातील खटाव (वडूज) तालुक्याचा समावेश पूर्व भागात होत असून साताऱ्याच्या उत्तर-पूर्व दिशांना तालुक्याचे क्षेत्र आहे. खटाव तालुक्याच्या कामकाजाकरिता खटाव, पुसेसावळी, वडूज आणि मायणी अशी मंडल कार्यालये तयार करण्यात आली आहेत. तालुक्याचे मुख्य कार्यालय आणि अन्य महत्त्वाची शासकीय, निमशासकीय कार्यालये वडूज येथे आहेत.


MAHARASHTRA STATE
SATARA DISTRICT
MADHYA PRADESH
N
GUJRAT
DHULE
JALGAON
NASIK
THANA
AHAMEDNAGAR
AURANGABAD
JALANA
BULDHANA
AKOLA
AMRAVATI
NAGPUR
BHANDARA
VARDHA
CHANDRAPUR
GADCHIROLI
YEOTMAL
BID
PARBHANI
NANDED
OSMANABAD
LATUR
PUNE
RAIGAD
SATARA
SOLAPUR
SANGLI
SINDHUDURG
KOLHAPUR
RATNAGIRI
0
100
200 K.M.




LOCATION SHOWING OF KHATAV TAHSIL IN SATARA DISTRICT.

२.२.१ तालुक्याच्या सीमा :

खटाव तालुक्याच्या पूर्वेस माण, तालुका व पश्चिमेस कराड आणि कोरेगाव, दक्षिणेस खानापूर (जिल्हा सांगली) आणि उत्तरेस फलटण या तालुक्यांच्या सीमा येतात.

२.२.२ क्षेत्रफळ :

खटाव तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १३६४५७ हेक्टर्स असून सातारा जिल्हाच्या एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे १२ टक्के इतके आहे. क्षेत्रफळाबाबत तालुक्याचा जिल्हात तिसरा क्रमांक लागतो. तालुक्यातील ७० टक्के क्षेत्रफळ ग्रामीण आणि ३० टक्के नागरी क्षेत्रफळ आहे.

२.३ हवामान :

सातारा जिल्हातील खटाव आणि माण या तालुक्यांचा समावेश पर्जन्यछायेच्या भागात होतो. त्यामुळे या भागात उन्हाळा अधिक तीव्र असतो.

२.३.१ तपमान :

सातारा जिल्हातील कमाल तपमान ३६.४ सेंटिग्रेड व किमान तपमान १५.७ सेंटिग्रेड आहे. खटाव तालुक्यातील कमाल तपमान जिल्हातील कमाल तपमानापेक्षा जास्त असून ते ३७.२ सेंटिग्रेड आहे. तर किमान तपमान जिल्हातील किमान तपमानापेक्षा कमी असून ते १४.५ सेंटिग्रेड आहे.

२.३.२ पर्जन्य :

या तालुक्याचा समावेश पर्जन्यछायेच्या भागात होत असल्याने पर्जन्याची अनिश्चितता आणि असमानता आढळून येते. तालुक्यात जून ते सप्टेंबर महिन्यात पाऊस पडतो. पूर्वेकडील भागापेक्षा पश्चिमेकडील भागात सरासरी पर्जन्य जास्त असते. त्यामुळे पिकांची रचना भिन्न आढळते.

खटाव तालुक्यात वार्षिक सरासरी १८ ते २० इंच पाऊस पडतो.

## २.४ लोकसंख्येची रचना :

१९८१ च्या जनगणनेनुसार खटाव तालुक्याची लोकसंख्या २०२७०१ इतकी आहे. एकूण लोकसंख्येत स्त्रियांची संख्या पुरूषांपेक्षा अधिक असून १०,४००० इतकी आहे तर ९८००० पुरूषांची संख्या आहे. ही लोकसंख्या संपूर्ण तालुक्यात लहान मोठ्या नव्वद खेड्यात विभागली आहे. लोकसंख्येतील झालेला बदल पुढील कोष्टकात स्पष्ट केला आहे.

कोष्टक क्र. २.१

लोकसंख्येतील दशकानुसार बदल

| लोकसंख्या (लाखात) | | | दशकानुसार बदल | | घनता दर चौ.कि.मीटर |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | २. | | ३. |
| १९६१ | १९७१ | १९८१ | १९६१-७१ | १९७१-८१ | १९७१-८१ |
| १.५५ | १.७७ | २.२ | १३.८३ | १४.२० | १३५ |

संदर्भ : District Handbook of SATARA.

## लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी :

खटाव तालुक्याची १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २०२७०१ इतकी आहे त्याची विभागणी व्यवसायानुसार खालील कोष्टकात केलेली आहे.

कोष्टक क्र. २.२

लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी (१९८१ नुसार)

| अनु. | तपशील | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | शेतकरी | ४२४०० |
| २. | शेत मजूर | १२७६७ |
| ३. | घरकाम करणारे | २३१६ |
| ४. | अधिक काम करणारे | १७५५९ |
| ५. | इतर कामे करणारे | १०९७९ |
| ६. | काम न करणारे (नाकर्ती लोकसंख्या) | ११६६८० |
| | एकूण लोकसंख्या : | २०२७०१ |

संदर्भ : सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण सातारा जिल्हा

कोष्टक क्र. २.२ वरून असे निदर्शनास येते की, खटाव तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या शेकडा ३४ टक्के लोकसंख्या काम करणारी असून शेतकऱ्यांचे प्रमाण शेकडा ५० टक्के आणि शेतमजूरांचे त्यात एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण सुमारे ११ टक्के आहे. सातारा जिल्हातील अन्य तालुक्याच्या तुलनेने खटाव तालुक्यात शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट होते.

तक्ता क्र. २.३

सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येची तालुक्यानुसार विभागणी (१९८१ च्या जनगणनेनुसार)

| अनु. | तालुक्याचे नाव | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | कराड | ३८२६७७ |
| २. | सातारा | २९२६३५ |
| ३. | पाटण | २३३२६५ |
| ४. | फलटण | २२४०१८ |
| ५. | खटाव | २०२७०१ |
| ६. | कोरेगांव | १९०६०५ |
| ७. | वाई | १४३२१७ |
| ८. | माण | १४५२२३ |
| ९. | जावळी | १०५२८७ |
| १०. | खंडाळा | ८२५७४ |
| ११. | महाबळेश्वर | ३६४७५ |
| | एकूण : | २०३८६७७ |

२.५ मृदा :

भू-रचनेच्या भिन्नतेनुसार खटाव तालुक्यात सर्वत्र सारख्या प्रतीची मृदा नाही. प्रामुख्याने मध्यम काळी, लॅटेराईट, खडकयुक्त तांबडी मृदा आणि माळरान अशा प्रकारची मृदा आढळते. ` येरळा ` नदीच्या माणलोट क्षेत्रात उत्तम प्रतीची मृदा असून त्यामध्ये ज्वारी, ऊस, गहू, हळद, भूईमूग ही पिके घेतली जातात.

तालुक्याच्या पूर्वेकडील भाग दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. या परिसरात वालुकामिश्रीत खडकाळ, आणि माळरान अशा प्रकारची जमीन अधिक आहे. खरीप हंगामात संकरीत ज्वारी, घेवडा, बाजरी आणि कडधान्ये यांचे उत्पादन घेतले जाते. तर रब्बी हंगामात पाणी पुरवड्याच्या अनुकुलतेनुसार ज्वारी, गहू, हरभरा ही पिके घेतली जातात. प्रामुख्याने या भागातील अपुरा पाऊस, हलक्या प्रतीची जमीन यामुळे उत्पादकता कमी आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने शेती क्षेत्रात फार गुंतवणूक करणे शक्य होत नाही. या भागातील बाजरी हे प्रमुख पीक आहे.

२.६ <u>नदी</u> :

खटाव तालुक्यात ` येरळा ` ही एकमेव नदी आहे. या नदीचा उगम वर्धनगड - महिमानगड दरम्यानच्या सोलाकनाथ टेकड्यामध्ये झालेला आहे. नेर आणि येरळवाडी येथे या नदीवर धरणे बांधण्यात आली आहेत.

येरळा नदी नेर, पुसेगाव, खटाव, वडूज, निमसोड, चितळी, या गावांच्या सुमारे ६० किलोमीटर लांबीच्या परिसरातून वाहत जाऊन पुढे सांगली जिल्ह्यात ` कृष्णा ` नदीस मिळते. या नदीच्या पाणलोट क्षेत्रात कृत्रिम पाणी पुरवठा सोयीद्वारे ऊस, कापूस, गहू, ज्वारी, बटाटा, कांदा, भूईमूग ही पीके घेतली जातात.

२.७ <u>शेती व्यवसाय</u> :

शेती हा खटाव तालुक्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. सुमारे ९० टक्के लोकसंख्या आणि २९ कार्यशक्ती शेती व शेती संबंधित व्यवसायात गुंतली आहे. परंतु पर्जन्याची अनिश्चिती, आर्थिक दुर्बलता, कमी उत्पादकता यामुळे शेतीचे स्वरूप मागासलेले आहे.

खटाव तालुक्यातील एकूण जमिनीचा वापर विविध घटकानुसार पुढीलप्रमाणे झालेला दिसून येतो.

कोष्टक क्र. २.४

खटाव तालुक्यातील जमिनीचा वापर

| अनु. | तपशील | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १. | एकूण भौगोलिक क्षेत्र | १३६४५७ |
| २. | जंगलव्याप्त क्षेत्र | ७९०० |
| ३. | शेतीस उपलब्ध नसलेले | १६९०० |
| ४. | एकूण लागवडीलायक क्षेत्र | १०२६०० |
| ५. | निव्वळ पीकांखालील क्षेत्र | ९६५४० |
| ६. | एकापेक्षा जास्त पीकांखालील क्षेत्र | १३७९५ |
| ७. | लागवडीलायक पण वापरात नसलेले व पड क्षेत्र | ३८३२ |

संदर्भ : तपशील कार्यालय, वडूज, ता. खटाव.

२.७.१ पीकांचा आकृतीबंध :

भौगोलिक स्थिती, हवामान आणि मृदा या घटकांचा परिणाम पीकांच्या रचनेवर झालेला आहे. प्रामुख्याने अपुरा पाऊस, खडक आणि वाळू मिश्रीत जमीन यामुळे खरीप हंगामात संकरीत ज्वारी, घेवडा, बाजरी, तूर, मटकी, कापूस आणि इतर कडधान्य यांचे उत्पादन घेतले जाते. तर रब्बी हंगामात ज्वारी, गहू, करडई, हरभरा या पिकांचे उत्पादन घेतले जाते. मुख्यत्वेकरुन कमी पावसावर येणाऱ्या पीकांचे आणि कडधान्यांचे उत्पादन घेतले जाते.

खटाव तालुक्यातील पीकांचा आकृतीबंध पुढील कोष्टकात स्पष्ट केला आहे.

कोष्टक क्र. २.५

खटाव तालुक्यातील पीकांचा आकृतीबंध (क्षेत्र - हेक्टरमध्ये)

| अनु. | पीकांचे नाव | १९८०-८१ | १९८८-८९ |
|---|---|---|---|
| अ) | तृणधान्ये - | | |
| | १. ज्वारी | २२५०० | २५७०० |
| | २. बाजरी | ४६००० | ४४९०० |
| | ३. गहू | ३१०० | ४९०० |
| | ४. भात | ९६० | ८०० |
| | ५. इतर तृणधान्ये | ७५० | ६०० |
| ब) | कडधान्ये : | | |
| | १. हरभरा | २९५० | ३३०० |
| | २. तूर | २२८० | २४०० |
| | ३. उडीद | २००० | १७६० |
| | ४. इतर कडधान्ये | १५६०० | १३१४० |
| क) | गळिताची धान्ये : | | |
| | १. भुईमूग | ११३० | १२०० |
| | २. सूर्यफूल | १९० | २८० |
| | ३. करडई | ६७० | ४५० |
| ड) | इतर पीके : | | |
| | १. ऊस | ७३५ | १२६० |
| | २. कापूस | ६१० | २३५ |
| | ३. मसाल्याची व इतर पीके | १९७० | २१०० |

संदर्भ : कृषि विभाग, पंचायत समिती, वडूज

सर्वसाधारणपणे कोष्टक क्र. २.५ यावरुन खटाव तालुक्यातील पीक पध्दतीतील बदलाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे दिसून येते.

१) एकूण अन्नधान्य (ज्वारी, बाजरी, गहू, भात) पीकांचे उत्पादन खटाव तालुक्यात अधिक होते. अन्नधान्याच्या पीकांखाली १९८८-८९ मध्ये ७६,९०० हैक्टर जमिनीचे क्षेत्र होते. १९८०-८१ या वर्षाशी तुलना करता सुमारे ३००० हैक्टरनी या क्षेत्रात वाढ झालेली आहे.

२) कडधान्य उत्पादनात खटाव तालुका सातारा जिल्हात अग्रेसर आहे. १९८८-८९ या वर्षी कडधान्य पीकांखाली सुमारे २०५०० हैक्टर जमिनीचे क्षेत्र होते. १९८०-८१ या वर्षाशी तुलना करता सुमारे १२९० हैक्टैर इतकी घट झाली आहे.

३) ऊस, कापूस, फळे आणि भाजीपाला या पीकांच्या तुलनात्मक-दृष्टया उत्पादनात हा तालुका मागासलेला आहे.

४) १९८१- ते १९८८ या कालावधीत प्रामुख्याने ज्वारी, गहू, हरभरा, ऊस, सुर्यफूल, तूर या पीकांखालील जमिनीच्या क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते. प्रामुख्याने घरगुती अन्नधान्याची गरज, पुरेशा प्रमाणात उत्पन्न मिळवून देणारी उत्पादने औलित व्यवस्थेतील वाढ आणि स्थानिक बाजारात विक्री शक्य या कारणांमुळे या पीकांखालील जमीनीच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे.

५) बाजरी, भात, करडई, कापूस उडीद या पीकांच्या क्षेत्रात काही प्रमाणात घट झालेली आहे. कारण पर्जन्याची कमतरता, फळे भाजीपाला पीकांखालील क्षेत्रात वाढ, अधिक उत्पन्न मिळवून देणा-या पिकांची गरज, अशा विविध कारणांमुळे या पीकां खालील क्षेत्रात घट झालेली आहे.

यावरून असे लक्षात येते की, खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांची वृत्ती काही प्रमाणात पैशाची पीके घेण्याकडे बदललेली आहे. साहजिकच तृणधान्ये, कडधान्ये यांचे खालील जमिनीचे क्षेत्र घटले आहे.

## २.७.२ शेतकऱ्यांची धारणक्षेत्रानुसार विभागणी :

खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांची जमिनीच्या धारण क्षेत्रानुसार विभागणी केल्यास लहान शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते आणि मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

कोष्टक क्र. २.६

तालुक्यातील शेतकऱ्यांची धारणक्षेत्रानुसार विभागणी

| अनु. | तपशील | शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | ० ते १ हेक्टर | ९७९२ |
| २. | १ ते २ हेक्टर | २६९७८ |
| ३. | २ ते ३ हेक्टर | ६३१० |
| ४. | ३ ते ४ हेक्टर | ३१२० |
| ५. | ४ ते ५ हेक्टर | २३७० |
| ६. | ५ ते ६ हेक्टर | १८९० |
| | एकूण संख्या | ५०४६० |

संदर्भ : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडूज (खटाव)

कोष्टक क्र. २.६ वरून ध्यानात येते की, खटाव तालुक्यात १ ते २ हेक्टर जमिनीचे धारणक्षेत्र असणारे सर्वाधिक म्हणजे २६९७८ इतके लहान शेतकरी आहेत. तर ५ ते ६ हेक्टरपेक्षा अधिक जमीन धारणा असलेले मोठे शेतकरी फक्त १८९० इतके आहेत. सरकारी सोयी-सवलती, अनुदाने, योजना त्यांचा लाभ घेण्याच्या दृष्टिकोनातून आणि जमिनीच्या तुकडीकरणाच्या कारणामुळे लहान आकाराणच्या जमिनी धारकांची संख्या वाढलेली आहे.

२.७.३ <u>ओलित व्यवस्था</u> :

खटाव तालुक्यातील शेतीही प्रामुख्याने नैसर्गिक पर्जन्यावर अवलंबून आहे. याशिवाय शेतीसाठी विहिरी, बंधारे, पाझार तलाव, लहान कालवे या जलसिंचन साधनांचा वापर करण्यात येतो. विहिरी हेच बारमाही पाणी पुरवठ्याचे महत्वाचे साधन आहे. अन्य बंधारे, कालवे, पाझार तलाव यांचा उपयोग फक्त पावसाळ्यानंतर रब्बी हंगामात केला जातो.

खालील कोष्टकाच्या आधारे तालुक्यातील एकूण लागवडीखालील जमिनीचे ओलित जमिनीच्या क्षेत्राशी असलेले प्रमाण स्पष्ट केले आहे.

कोष्टक क्र. २.७

खटाव तालुक्यातील ओलिताखालील जमिनीचे क्षेत्र

| अनु. | वर्ष | निव्वळ लागवडीखाली असलेल्या क्षेत्राशी ओलिताखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | १९६०-६१ | ६.९७ |
| २. | १९७०-७१ | ७.९१ |
| ३. | १९७८-७९ | १२.८६ |
| ४. | १९८८-८९ | १४.७५ |

संदर्भ : सामाजिक आर्थिक सर्वेक्षण, सातारा जिल्हा.

१९६०-६१ व १९८८-८९ या कालावधीत ओलित क्षेत्रात दुप्पट पेक्षा जास्त वाढ झाली आहे. प्रामुख्याने पाझर तलाव, विहिरी, सरकारी योजना, यामुळे ओलिताखालील क्षेत्र वाढत आहे.

२.७.४ ओलिताची साधने :

खटाव तालुक्यातील शेतीच्या जलसिंचनाच्या सोयीपैकी विहिरींचा अधिक प्रमाणात वापर होतो, त्याशिवाय लहान कालवे, बंधारे, तळी, उपसा जलसिंचन योजना यांचाही कमी-अधिक प्रमाणात अवलंब होतो.

विहिरींची संख्या ९५९३ असून त्यावर ४५९० विद्युत मोटार पंप्स व १८४० ऑईल इंजिन्स आहेत. ओलित व्यवस्थेचे साधनांनुसार विभाजन केल्यास ओलित साधनांची एकूण संख्या आणि ओलित क्षेत्राशी असलेले शेकडा प्रमाण याची स्पष्ट कल्पना येते.

कोष्टक क्र. २.८

औलिताची साधने व शेकडा प्रमाण

| अनु. | तपशील | संख्या | एकूण औलित क्षेत्राशी असलेले शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विहिरी | ९५९३ | ७५.०० |
| २. | तळी | १६३ | ११.०० |
| ३. | कालवे | ७ | ४.०० |
| ४. | मध्यम प्रकल्प | १५ | ३.०० |
| ५. | इतर साधने | - | ७.०० |
| | एकूण : | | १००.०० |

संदर्भ : आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण, सातारा जिल्हा.

२.८ जंगल :

जंगलाखाली तालुक्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ५.४ टक्के म्हणजे सुमारे ७१०० हेक्टर इतके आहे. अलिकडे रोजगार हमी योजना व सामाजिक वनिकरण योजनामुळे या क्षेत्रात वाढ होत आहे. तालुक्यातील बहुतांशी भाग पर्जन्य छायेचा असल्याने याकडे अधिक लक्ष पुरवण्यात येत आहे. तसेच रोजगार उपलब्धतेसाठी योजनांची कार्यवाही करण्यात येत आहे.

२.९ वाहतूक व्यवस्था :


आर्थिक विकासात वाहतूक व दळणवळणाच्या सेवा-सुविधांना महत्व आहे. परंतु सातारा जिल्हातील अन्य तालुक्याच्या तुलनेने खटाव तालुक्यात वाहतुकीच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. रेल्वे मार्ग, राष्ट्रीय महामार्ग यांचा तालुक्यात अभाव आहे. तालुक्यातील मुख्य दोन राज्य महामार्गांची लांबी २१० किलोमीटर आहे. अन्य जिल्हा प्रमुख रस्ते, जिल्हा रस्ते, गांव रस्ते व इतर रस्त्यांची संख्या अधिक आहे. तसेच खटाव तालुक्यातील फक्त २७० किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झालेले असून इतर रस्ते खडीचे व कच्चे आहेत.

खालील कोष्टकातून तालुक्यातील वाहतूक व्यवस्थेची अधिक स्पष्ट कल्पना येईल.

कोष्टक क्र. २.९

खटाव तालुक्यातील वाहतूक व्यवस्था

| अनु. | तपशील | एकूण लांबी (किलोमीटर) |
|---|---|---|
| अ) | रेल्वेमार्गांची लांबी - | |
| | १. सिंगल ब्रॉडगेज | - |
| | २. मीटर गेज | - |
| | ३. नॅरो गेज | - |
| | रेल्वेमार्गांची एकूण लांबी | - |
| ब) | खटाव तालुक्यातील रस्त्यांची लांबी (१९८८-८९) - | |
| | १. राष्ट्रीय महामार्ग | २१० |
| | २. राज्य महामार्ग | ११५ |
| | ३. जिल्हा प्रमुख रस्ते | ११५ |
| | ४. इतर जिल्हा रस्ते | १४९ |
| | ५. गाव रस्ते | ४७० |
| | ६. इतर रस्ते | ६३१ |
| | एकूण लांबी | १५७५ |


KHATAV TALUKA
(SATARA DISTRICT)
0 2 4 6 8
Scale of Miles
N
M·D·R·
RIVER
HILLS
PHALTAN TALUKA
MAN TALUKA
SANGLI DISTRICT
To DAHIWADI
To MALWADI
To PANDHARPUR
To DAHIWADI
FROM KOREGAON
PUSEGAON
KHATAV
RAHIMATPUR
VADUJ
FROM SATARA
AUNDH
YERLA RIVER
PUSESAVLI
MAYANI
To PICANCHI
FROM UMBRAJ
FROM TASGAON
FROM VITA

कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, खटाव तालुक्यात वाहतुकीची पुरेशी सोय नाही. बाजार क्षेत्रात शेतमालाची ने-आण उत्पादक शेतकरी माडोत्री, ट्रक, ट्रॅक्टर आणि बैलगाडी यांच्या सहाय्याने करतात. खटाव तालुक्यात होणारी शेतमालाची वाहतुकीचे शेकडा प्रमाण आणि साधन यांचा तपशील खालील कोष्टकात स्पष्ट केलेला आहे.

कोष्टक क्र. २.१०

शेतमाल वाहतुकीची साधने

| अनु. | वाहतूक साधने | शेतमालाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | बैलगाडी | ५०.०० |
| २. | ट्रॅक्टर | ३०.०० |
| ३. | ट्रक | २०.०० |
| | एकूण : | १००.०० |

संदर्भ : बाजार समिती, वडूज, अहवाल १९८८-८९.

वाहतूक साधनांच्या अपुरेपणामुळे शेतकऱ्यांना विविध समस्या भेडसावत असतात. उदा. वाहतुकीचा अधिक खर्च, अयोग्यवेळी उपलब्धता, आर्थिक तोटा इत्यादी. प्रामुख्याने शेतीचा मागासलेपणा, औद्योगिकरणाचा अभाव, कच्चे रस्ते, आर्थिक दुर्बलता यामुळे वाहतूक साधने मर्यादित आहेत.

नाशवंत शेतमालाच्या विपणनाच्या दृष्टीने वाहतुकीच्या सोयी महत्वाच्या असतात. उदा. फळे, अंडी, भाजीपाला, दूध इत्यादी, कारण अशा वस्तूंना जलद बाजार पेठेत विक्रीसाठी पोहोचविणे आवश्यक असते.

थोडक्यात वाहतूक व्यवस्था ही अपुरी असल्यामुळे उत्पादकांचे आर्थिक नुकसान होते.

२.१० आठवडी बाजार :

खटाव तालुक्यामध्ये आठवड्यातून ५ प्रमुख बाजार आणि ८ उपबाजार असे १३ ठिकाणी बाजार भरतात. जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य यांच्या खरेदी-विक्री तालुक्यातील आणि जवळपासच्या खेड्यांतील लोक येतात. बाजाराचे नियंत्रण, व्यवस्थापन स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत होते. वडूज ही तालुक्यातील मुख्य नियंत्रित बाजारपेठ आहे. आठवड्यातून एक वेळ वडूज, औंध, कलेढोण, पुसेसावळी येथे शेळ्या-मेंढर्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात, वडूज येथे बैल, गायी, शेळ्या, मेंढयांचा बाजार भरविला जातो.

पुढील तक्त्यात आठवडी बाजाराचे ठिकाण, दिवस किंवा वार यांचा उल्लेख केला आहे.

तक्ता क्र. २.११

खटाव तालुक्यातील आठवडी बाजार

| तालुका | आठवडी बाजाराची संख्या | दिवस, | आठवडी बाजाराची ठिकाणे |
|---|---|---|---|
| खटाव | १३ | रविवार | पुसेगाव, मायणी, कातर खटाव |
| | | सोमवार | बुध |
| | | मंगळवार | कलेढोण, खटाव, औंध |
| | | बुधवार | पुसेसावळी, डिस्कळ |
| | | गुरुवार | चितळी |
| | | शुक्रवार | - |
| | | शनिवार | वडूज, म्हासुर्णे |

संदर्भ : कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

आठवडी बाजारात अनेक अनिष्ट प्रथा दिसून येतात, त्यात चुकीची वजने-मापे, दलालांची संख्या अधिक उत्पादकांची फसवणूक इत्यादी. शिवाय बाजारात वाहतूक, पिण्याचे पाणी, ऊन, पावसापासून असुरक्षितता अशा अडचणी जाणवतात. अलिकडे स्थानिक स्वराज्य संस्थांनी अशा बाजाराच्या ठिकाणी अत्यावश्यक सुविधा निर्माण केलेल्या दिसून येतात.

२.११ <u>बँक सेवा-सुविधा</u> :

खटाव तालुक्यात बँकिंगच्या सोयी अधिक प्रमाणात उपलब्ध नाहीत, प्रामुख्याने सरकारी क्षेत्रातील, सहकारी क्षेत्रातील बँका आणि अनुसूचित बँकाच्या शाखा उघडण्यात आल्या आहेत. सहकारी तत्वावर काही ग्रामीण, नागरी, पतसंस्थांची निर्मिती केलेली आहे.

पुढील कोष्टकात तालुक्यातील बँका, शाखा व त्यांची संख्या याचा उल्लेख केला आहे.



वडूज बाजार समितीतील शेतमालाचे
खरेदी विक्री व्यवहार .



जनावरांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार .

SHIVAJI UNIVERSITY (LIBRARY) KOLHAPUR



वडूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालय



वडूज बाजार समितीचा परिसर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कोष्टक क्र. २.१२

खटाव तालुक्यातील बँकिंग व्यवस्था

| अनु. | तपशील | बँकांची संख्या |
|---|---|---|
| अ) | सरकारी क्षेत्रातील बँका - | |
| | १. भारतीय स्टेट बँक शाखा | ३ |
| | २. बँक ऑफ इंडिया शाखा | ६ |
| | ३. महाराष्ट्र बँका शाखा | ३ |
| | ४. कृषि व ग्रामीण विकास बँक लि., मुंबई | २ |
| ब) | सहकारी क्षेत्रातील बँका - | |
| | १. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा शाखा | १३ |
| | २. मायणी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., शाखा | १ |
| | ३. विटा मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., शाखा | २ |
| | ४. प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., शाखा | १ |
| क) | अनुसूचित बँका - | |
| | १. दि सांगली बँक लि., शाखा | १ |
| | २. युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा शाखा | १ |
| | बँकांच्या एकूण शाखा : | ३३ |

संदर्भ : भारतीय स्टेट बँक शाखा वडूज, उपलब्ध माहिती आधारे.

वरील कोष्टक क्रमांक २.१२ वरून असे स्पष्ट होते की, खटाव तालुक्यामध्ये विविध क्षेत्रातील बँकांची एकूण संख्या ३३ आहे. बँक व्यवस्थेमुळे आणि शासनाच्या सुधारीत धोरणानुसार शेती व्यवसायाच्या प्रगतीत वाढ होत असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने शेतीसाठी, जमीन सुधारणा, ओलित व्यवस्था, फळबागा, पीक तारण कर्ज या स्वरूपात कर्ज पुरवठा जमीन तारणावर केला जात आहे. परंतु शेतकरी वर्ग दुर्बल घटक असल्याने हंगामानंतर शेती उत्पादित मालाची विक्री तात्काळ करण्याची घाई असते. यावर परिणामकारक मार्ग म्हणजे बँकांनी शेतकऱ्यांना तारण कर्जाप्रमाणेच ' बाजार कर्जाची ' सोय उपलब्ध करून द्यावी, त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांची प्रतिक्षा क्षमता वाढण्यास मदत होईल आणि योग्य किंमत येईपर्यंन्त थांबणे शक्य होईल. साहजिकच त्यामुळे शेती व्यवसाय आणि शेतकऱ्यांच्या विकासाला संधी उपलब्ध होईल.

२.१२ <u>सहकारी संस्था</u> :

महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा, १९६० नुसार खटाव तालुक्यामध्ये १९८९ अखेर नोंदणी केलेल्या विविध प्रकारच्या लहान मोठया सहकारी संस्थांची संख्या केवळ १२४ आहे. त्यात खटाव तालुका खरेदी-विक्री संघ, शेती पुरवठा संस्था, शेती पाणी पुरवठा संस्था, तसेच ग्राहक सहकारी दुग्ध व्यवसाय सहकारी, मजूर सहकारी, विणकर सहकारी, बलुतेदार सहकारी, हातमाग सहकारी, वाहतूक सहकारी इत्यादी सहकारी संस्था अस्तित्वात आहेत.

पुढील कोष्टकात तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांची संख्या दर्शविली आहे.

## कोष्टक क्र. २.१३

## खटाव तालुक्यातील सहकारी संस्था

| अनु. | तपशील | संख्या | |
|---|---|---|---|
| | | ३०-६-१९८९ | ३०-६-१९९० |
| १. | शेती पुरवठा सहकारी संस्था | ९१ | ९१ |
| २. | पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था | ५ | ५ |
| ३. | नागरी पतपुरवठा सहकारी संस्था | ११ | २३ |
| ४. | अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका | १ | १ |
| ५. | ग्राहक सहकारी संस्था | ३ | ३ |
| ६. | ख.ता. सहकारी खरेदी-विक्री संघ | १ | १ |
| ७. | सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था | १ | १ |
| ८. | औद्योगिक सहकारी संस्था | ३ | ३ |
| ९. | पाणी पुरवठा सहकारी संस्था | ३४ | ३५ |
| १०. | गृहनिर्माण सहकारी संस्था | ५ | ५ |
| ११. | कुक्कुट पालन सहकारी संस्था | १५ | १९ |
| १२. | मजूर सहकारी संस्था | ३० | ३० |
| १३. | मच्छिमार सहकारी संस्था | ३ | ४ |
| १४. | विणकर सहकारी संस्था | ३ | ३ |
| | एकूण : | २०६ | २२४ |

संदर्भ : उप-निबंधक सहकारी संस्था, कार्यालय, वडूज (खटाव)

कोष्टक क्र. २.१३ वरून असे दिसून येते की, खटाव तालुक्यातील नोंदणी झालेल्या सहकारी संस्थामध्ये शेती पतपुरवठा सहकारी संस्थांची संख्या अधिक आहे. एकूण सहकारी संस्थाशी त्याचे शेकडा प्रमाण ४१ टक्के आहे. ग्राहक आणि औद्योगिक सहकारी संस्थाचा विकास अत्यल्प आहे. अर्बन बँका व कुक्कुट पालन सहकारी संस्थांची वाढ चांगली झाल्याचे स्पष्ट होते. तालुक्यात सहकारी जिनिंग व प्रेसिंग संस्था अद्याप कार्यान्वित नाही. थोडक्यात खटाव तालुक्यात सहकारी चळवळीची प्रगती फारशी समाधानकारक नाही.

२.१३ <u>पशुधन</u> :

शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून खटाव तालुक्यात मोठया प्रमाणावर 'पशुपालन' व्यवसाय केला जातो. प्रामुख्याने तालुक्यातील शेतीचे मागासलेले स्वरुप, अपुरा पाऊस, डोंगराळ भाग व आर्थिक हेतू यामुळे या व्यवसाय करण्याकडे लोकांची प्रवृत्ती आढळते. पशुपालन यामध्ये शेळ्या, मेंढया, गायी (खिलार व संकरीत) म्हैसी यांचा समावेश होतो. शिवाय शेतीच्या मशागतीसाठी बैलांची जोपासना केली जाते. पशुपालन व्यवसायामुळे शेतीस शेणखत आणि उत्पन्न मिळविण्याचे साधन उपलब्ध होते. अलिकडील सरकारच्या उत्तेजनात्मक धोरणामुळे व बाजारातील पशुधन घटकांच्या वाढत्या किंमती यामुळे या उद्योगास महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

पुढील तक्त्यात १९८९ अखेरची खटाव तालुक्यातील पशुधनाची स्थिती स्पष्ट केलेली आहे.

तक्ता क्र. २.१४

खटाव तालुक्यातीलपशुधन

| अनु. | तपशील | संख्या (१९८८-८९) अखेर |
|---|---|---|
| १. | शेतीस उपयुक्त जनावरे | ३६१८६ |
| २. | शेतीस उपयुक्त नसलेली जनावरे | ४६२८९ |
| ३. | शेळ्या-मेंढ्या यांची एकूण संख्या | ७८१८५ |
| | एकूण : | १६०६६० |
| | कोंबड्यांच्या एकूण संख्या: | १५०१४० |

संदर्भ : कृषि विभाग, पंचायत समिती, वडूज (खटाव)

२.१४ तालुका प्रशासन :

खटाव तालुक्याचे मुख्यालय वडूज आहे, तहशील कार्यालय, न्यायालय, पंचायत समिती कार्यालय व इतर महत्त्वाची सरकारी, सहकारी कार्यालये केंद्रित आहेत. याच ठिकाणी कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालय आणि मुख्य बाजार आवार आहे. सुमारे १३२ लहान-मोठया खेड्यांचे हे तालुका ठिकाण आहे. प्रशासनाच्या दृष्टिकोनातून तालुका विस्तीर्ण आहे.

## संदर्भ सूची


१) सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण, सातारा जिल्हा.

२) पंचायत समिती कार्यालय, वडूज.

३) जिल्हा परिषद, सातारा.

४) उप-निबंधक सहकारी संस्था, वडूज.

५) भारतीय स्टेट बँक, शाखा वडूज.

६) कृषि उत्पन्न बाजार समिती, वडूज.

७) तहशील कार्यालय, वडूज.